अग्रतश्चतुरो वेदा: पृष्ठत: सशरं धनु: ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र



वर्ष ४८ वे

अंक ३ रा

१० मार्च २०२६

किंमत १ रुपया







## हिंदू नववर्ष गुढी पाडवा

## व रामनवमी

निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

# वंन्दे मातरम् आणि वेद

वंन्दे मातरम् हा या राष्ट्राचा महामंत्र आहे. या राष्ट्राची एकता दृढ करण्याचे सामर्थ्य वंन्दे मातरम् या महामंत्रात आहे. ऋषी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या लेखणीतून वंन्दे मातरम् हे गीत १८७५ मध्ये अवतरले. या वर्षी या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहे. एका अर्थाने वंन्दे मातरम् गीताची सार्धशती वर्ष आपण साजरे करीत आहोत. कलकत्त्याजवळ काटलपाडा हे छोटेसे खेडे होते. अश्विन शुद्ध नवमीचा तो शुभदिन होता. त्या वेळी नवरात्री घट बसले होते. महाराष्ट्रात भाद्रपदात गणेशोत्सव जसा घरोघरी साजरा होत असतो, तसा बंगालमध्ये नवरात्रोत्सव असतो. नोकरीतून काही दिवसांसाठी रजा घेऊन बंकिमचन्द्र आपल्या या जन्मगावी काटलपाडा येथे मातोश्री व बंधू यांना भेटण्यासाठी आणि नवरात्रासाठी आले होते. त्यांच्या घरी रोज श्रीसूक्ताचे पठण होत असे. बंकिमचंद्रांचे पाठांतर उत्तम होते. श्रीसूक्ताचे पठण ऐकताना त्यांच्या डोळ्यांपुढे भारतमातेचा नकाशा उभा राहिला. त्यात सागरातील पाण्यावर लक्ष्मी उभी असल्यासारखी आहे असे त्यांना जाणवले. हिमालय, काश्मीर, गुजरात, मेवाड, ओरिसा ही तिची करकमले, महाराष्ट्र हा तिचा उरोभाग, कर्नाटक हे पदकमळे, केरळ (कन्याकुमारी) ही तिची तळपदकमळे असे तिचे रूप त्यांच्या प्रज्ञाचक्षुपुढे साकार झाले असावे, असे वंन्दे मातरम्चा सूक्ष्म अभ्यास करताना जाणवते. त्यावेळी पारतंत्र्यात खितपत पडलेली सहा कोटी मुले त्यांना सापडावीत या आशयाने आणि त्यांच्या कवी मनात श्री सूक्त आणि भारतमाता कल्पना शब्दचित्र रंगवू लागली. सिंधूसंस्कृती मातृप्रधान असल्याने त्यात श्री लक्ष्मी पूजन निर्माण झाले आणि कालांतराने ऋग्वेदातील परिशिष्टात श्रीसूक्त आले आणि त्याच आशयातून हे लेखन आहे. श्री या नावामधे श्रीमंती, वैभव, वर्चस्व-शक्ती, आयुर्मान- गती, आरोग्य, शोधमान अर्थात सौन्दर्य, महियते म्हणजे परमोच्च स्थिती, धनसंपत्ती, पशुप्राणी, बहुप्रसवता अर्थात वंशवृद्धी, अभय ज्ञान, वैराग्य, शौर्य, विद्या, शांती, त्याग, दया, क्षमा, योग, दान, अहिंसा सत्य अशा अनेक सद्गुणांचा समावेश आहे. श्री म्हणजे हीच लक्ष्मीची वैशिष्ट्ये आहेत. नवरात्र हे लक्ष्मी (श्री विष्णू पत्नी), महालक्ष्मी (पार्वती), चामुंडा- दुर्गा वगैरे आवेश अवतारी उमा, सरस्वती म्हणजे शारदा-विद्येची देवता.

कलकत्ता येथील कालिमातेने पायाखाली चिरडून जसा शत्रू (रिपू) नाश केला, तसा भारतवासियांनी जुलमी ब्रिटिश शत्रूसत्तेचा नाश करून भारतमाता स्वतंत्र करावी, हा वंन्दे मातरम् मधील खरा भावार्थ आहे. बंकिमचंद्रांनी 'आमार दुर्गोत्सव' या आपल्या लेखात वंन्दे मातरम् गीत प्रथम ७ नोव्हेंबर १८७५ (कार्तिक शु.९ शके १७९७) मध्ये प्रसिद्ध केले. पुढे हे गीत घराघरांत पोहोचले.

कितीतरी जण वंन्दे मातरम् म्हणत स्वातंत्र्यप्राप्तीसाठी फासावर गेले. २८/१२/१८९६ रोजी कलकत्त्यास भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या १२ व्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोर यांनी स्वतः देस रागामध्ये संपूर्ण वंन्दे मातरम् गीत गायले. वंन्दे मातरम् गीत म्हणण्यास पुढे ब्रिटिशांनी बंदी घातली. देशप्रेमी जनतेने ती धुडकावून लावली. महात्मा गांधी यांनी वंन्दे मातरम् बद्दल 'हरिजन' मध्ये लिहिले 'हे राष्ट्र जोपर्यन्त आहे, तोवर हे गीत राहणारच!' वंन्दे मातरम् याला पुढे राष्ट्रगीताचा मान उत्स्फूर्ततेने लाभला आणि वंन्दे मातरम् गीताची अधिक व्यापकता वाढू लागली. हरिद्वार येथील रणधीर प्रकाशनाच्या 'बृहतस्तोत्र रत्नाकर' ह्या ग्रंथातील 'भारतभूमातृस्तोत्रम' या काव्याची सुरुवातच अशी आहे.

वंन्दे मातरमव्यक्तां व्यक्तां च जननीं पराम् ।।
दीनोऽहं बालकः कांक्षे सेवां जन्मनि जन्मनि ।।१।।

हेच दोन शब्द घेऊन, तेच सूत्र ठेवून ऋषी बंकिमचंद्र यांनी मातृभूमीप्रेमाचा एक अभूतपूर्व आविष्कार हजारो वर्षांच्या कालखंडानंतर पुन्हा एकदा भारतीय साहित्यात घडवला. ज्याचे परिणाम साहित्यापुरते मर्यादित न राहता सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात झाले. हे शब्द जाज्वल्य मातृभूमी भक्तीचे प्रतीक बनले. कदाचित यामुळेच प्राचीन काळी समाज घडवणाऱ्या ऋषींची उपमा बंकिमचंद्रांना दिली गेली. बंगालमधील श्रेष्ठ दर्जाचे कायदेपंडित, उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती आणि कलकत्ता विद्यापीठाचे व्हाइस चान्सलर असलेल्या गुरुदास बॅनर्जी यांनी वंगभंग विरोधी आंदोलनातील सभेमध्ये सर्वात प्रथम बंकिमचंद्रांना 'ऋषी बंकिम' असे संबोधले. त्यानंतर श्री अरविंदही बंकिमचंद्रांचा उल्लेख 'ऋषी बंकिम' असाच करू लागले ज्याप्रमाणे बाळ गंगाधर टिळक यांना 'लोकमान्य' ही पदवी जनमानसांतून मिळाली आहे, तोच मान बंकिमचंद्रांना 'ऋषी' या उपाधीने मिळाला आहे. गायनाचार्य पंडित विष्णू दिगंबर पलुसकर प्रत्येक सभेची सांगता वंन्दे मातरम् हे गीत गाऊन करीत होते. वंन्दे मातरम् मधील ओळी या बिंबप्रतिबिंब भावस्वरूपात ऋग्वेदातील श्रीसूक्त अर्थात ऋग्वेदाच्या पाचव्या मंडळातील आहे असे एकंदरीत वाटते. त्यात २५ सूक्ते अर्थात मंत्र आहेत. त्यातील आशय वंन्दे मातरम् मध्ये ओतून बंकिमचंद्रांनी खापरपणजोबांची (ऋषी) श्रीमंती आणखी समृद्ध केली आहे. वंन्दे मातरम् कडव्यांमधील भावार्थ असलेल्या बऱ्याच ऋचा ऋग्वेदातील अग्नी, पृथ्वी, आकाश, वायू, आप, औषधी मंडळामध्येही आहेत. श्री सूक्तात पंचवीस ऋचा अर्थात मंत्र आहेत. त्यातील पहिले चवदा मंत्र लक्ष्मीचे नाममहात्म्यावर आहेत. १५-१६ क्रमांकाचे मंत्र श्री सूक्ताचे विधानपर असून १७ ते २५ हे मंत्र फलश्रुती व पसायदानपर आहेत. या पंचवीस मंत्रांमध्ये विषय एकच असल्याने वेगवेगळ्या संदर्भात पुनरुक्ती असणे स्वाभाविक आहे. शिवाय हे मंत्र एकाच ऋषीने रचलेले नसून आनंद, कर्दम, चिक्लीत, इंदिरासुत वगैरे वेगवेगळ्या ऋषींनी रचलेले आहेत. त्यांचे नामोल्लेखही काही ऋचांमध्ये आहेत. ऋग्वेद हा सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी मौखिक स्वरूपात जगात निर्माण झालेला पहिला ग्रंथ. वेद हा प्रथम एकच होता. महर्षी व्यासांनी त्याचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद असे विभाजन सोयीसाठी केले. ऋग्वेदात दहा मंडले असून त्यातील सर्व मिळून सूक्तांची संख्या १०२८ आहे. या सूक्तांमधील ऋचा किंवा मंत्रांची संख्या १०५५२ आहे. त्यामध्ये श्री सूक्त हा खिल भाग (परिशिष्ट) आहे. ब्राह्मण्यके, पुराणे, महाभारत, भगवद्गीता वगैरेवर ऋग्वेदाचा भाव पडलेला आहे. इतकेच नव्हे तर संत नामदेव, ज्ञानदेव - निवृत्ती - सोपानदेव - मुक्ताई, एकनाथ - समर्थ रामदास, संत तुकाराम, मीराबाई वगैरे संतांच्या लेखनावर ऋग्वेदातील ऋचांचा प्रभाव आहे. वडिलोपार्जित वारसाहक्काने या संतांनी मुक्तहस्ताने त्याचा उपयोग केला आहे. त्यांनी आपल्या ऋषी-मुनींचे ऋचा रूपी धन अधिक श्रीमंत आणि समृद्ध केले आहे. सांगायला आनंद वाटतो की, ज्ञानेश्वरी हा युगप्रवर्तक तर पसायदानमधील प्रत्येक ओळीवर ऋग्वेदातील निरनिराळ्या ऋचांचा भाव उमटलेला आहे. सकल संतांनी ऋग्वेदातील ऋचांची श्रीमंतीच वर्धिष्णू केली आहे. आज वंन्दे मातरम् चा विचार केला तर ते म्हणजे विश्वाचे राष्ट्रगीतच आहे.

ऋषी बंकिमचंद्रांवर संस्कृत वाङ्मयाचे संस्कार होते. अथर्ववेदातील द्वादशमंडलातील ६३ ऋचा या 'पृथ्वीसूक्ते' म्हणून ओळखल्या जातात. वेद वाङ्मयातील ही सूक्ते प्राचीन भारताचे आद्य राष्ट्रगीत मानले जाते. बंकिमचंद्रांनी या सूक्तांचा निश्चितच अभ्यास केला असावा. वंन्दे मातरम् ची काही बीजे या सूक्तांमध्ये दिसतात. असे असले तरीही वंन्दे मातरम् हे या सूक्तांचे भाषांतर नव्हे. या सूक्तांच्या आणि इतर काही प्राचीन वाङ्मयाच्या वाचनानंतर बंकिमचंद्रांच्या अभ्यासू आणि चिंतनशील वृत्तीतून 'वन्दे मातरम्' लिहिले गेले. अथर्ववेदातील या ऋचांमध्ये पृथ्वीला माता असे संबोधले आहे. या भूमातेच्या सागर सरितांचे, शेतीमुळे उत्पन्न झालेले उत्कृष्ट धान्य, उत्तम पर्वतराजी असे वर्णन आले आहे. त्यात पृथ्वीमातेला गुलाम करण्यासाठी चालून येणाऱ्या शत्रूला नष्ट करण्याचे आवाहनही आहे आणि अखेरच्या ६३ व्या सूक्तात हे मातृभूमी मंगलकारक होऊन तू आम्हास सुप्रतिष्ठित आणि ज्ञानी बनव. हे ज्ञात्या, या भूमीमध्ये आम्हाला संपन्न आणि ऐश्वर्ययुक्त बनव, अशी प्रार्थनाही केली आहे.

वंदेमातरम्
सुजलां सुफलां मलयजशीतम् सस्यशामला मातरम् ।।
शुभ्र ज्योत्स्ना पुलकित यामिनीम् फुल्ल कुसुमित द्रुमदल शोभिनीम्
सुहासिनीं सुमधुर-भाषिणीम् सुखदां वरदां मातरम् ।। १।।
सप्तकोटि-कण्ठ-कलकल-निनाद-कराले
द्विकोटि- भुजैर्धृत-खरकरवाले अबला केन मा एत बले !
बहुबल-धारिणीं नमामि तारिणीम् रिपुदलवारिणीं मातरम् ।।

(पान नं.७ वर)

# नाशिक चा इतिहास आणि वारसा स्थळे - एक अनोखा कार्यक्रम

शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी स्नेहबंध मैत्रिणींचा महिला मंडळाने नाशिकचा इतिहास आणि वारसा स्थळे या विषयावर श्री. रमेश पडवळ (इतिहास अभ्यासक) यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व श्री. रमेश पडवळ यांचा परिचय सौ. मंगला जोगळेकर यांनी करून दिला. त्यांचे स्वागत श्री. विजय साने यांनी केले. मूळचे पुण्यातील रहिवासी, पत्रकारिता क्षेत्रात एम.ए. पदवी प्राप्त केलेले, पंधरा वर्षापासून नाशिकचा इतिहास व पुरातत्व अभ्यासाचा ध्यास घेतलेल्या श्री. रमेश पडवळ यांनी अतिशय सोप्या भाषेत PPT च्या माध्यमातून नाशिकचा इतिहास आणि नाशिकचे आगळीवेगळी माहिती सांगितली.

स्वा.सावरकर, दादासाहेब फाळके, कुसुमाग्रज यांचा इतिहास असलेल्या नाशिक जिल्ह्यात राहत असूनही गोदावरी, सार्वजनिक वाचनालय, सरकारवाडा, पांडव लेणी, काळाराम मंदिर याच्यापेक्षा नाशिकच्या वेगळ्या बाजूंबद्दल आपण अनेक जण अनभिज्ञ होतो. ६०००० वर्षांपूर्वीचे नाशिक, २००० वर्षांपूर्वीचे संदर्भ, राष्ट्रीय दर्जाची स्मारके नाशिकमध्ये आहेत. तसेच नाशिकमधील गड, मंदिरे, त्यावरील शिल्प त्यांचे अर्थ या गोष्टी वेगवेगळ्या चित्रांद्वारे माहित करून दिल्या. नाशिक मधील अभोणा सारख्या छोट्या छोट्या गावातील परंपरा संस्कृती याचीही आगळीवेगळी माहिती सांगितली.

राम भूमी म्हणून लौकिक असलेल्या नाशिकमध्ये राहणारे आपण ६०००० वर्षाचा याला वारसा आहे आणि नाशिक हे भारताची राजधानी होऊ शकले असते हे ऐकून नाशिकबद्दलचा अभिमान अधिक वाढला असल्याचे प्रत्येकालाच जाणवले. मुळात नाशिकचे नसलेले पण नाशिकमध्ये येऊन नाशिकचा इतका अभ्यास करून सोप्या भाषेत आपल्यापर्यंत नाशिक चा वारसा, संस्कृती, परंपरा उत्तम रीतीने व्याख्यानातून पोचवणाऱ्या श्री. रमेश पडवळ यांचे आभार सौ. अर्पिता हेरंब घारपुरे यांनी मानले.

सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष श्री. विजय साने, विश्वस्त श्री. देवेंद्र बापट, कार्यवाह श्री. नितीन सहस्रबुद्धे, कोषाध्यक्ष श्री. हेरंब घारपुरे तसेच कार्यकारिणी सदस्य, स्नेहबंधच्या सदस्या व संस्थेचे सभासद उपस्थित होते.

**- सौ. अर्पिता हेरंब घारपुरे**



## * सामुहिक व्रतबंधन *

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक संस्थेतर्फे व्रतबंधन सोहळा कार्यक्रम दि.०३/०५/२०२६ रोजी संस्थेच्या, श्री परशुराम भवन येथे आयोजित करण्यात येत आहे.**
**अधिक माहितीसाठी संस्था कार्यालय किंवा दिलेल्या फोन नंबरवर संपर्क करावा.**

**८३२९८९६८७८ / ०२५३-२५७६२४१ / ९८६०५१२२६७**



## अमृत महोत्सव सत्कार...



**संस्थेच्या प्रमुख उपक्रमांपैकी एक उपक्रम**
**ज्येष्ठ सभासदांचा सत्कार.**

**प्रति वर्षी प्रमाणेच ह्या वर्षी देखील श्री परशुराम जयंतीला म्हणजेच रविवार, दि. १९ एप्रिल २०२६ रोजी संस्थेच्या वतीने वयाची पंचाहत्तरी पूर्ण केलेल्या सभासद बंधू भगिनींचा सत्कार करण्यात येणार आहे. कुटुंबियातील व्यक्तींनी अशी नावे आपल्या संस्थेत प्रत्यक्ष येऊन अथवा ०२५३-२५७६२४१ अथवा मोबाईल नंबर ८३२९८९६८७८ वर दि.१० एप्रिल २०२६ पर्यंत नोंदवावी ही विनंती.**

**या कार्यक्रमाची अधिक माहिती पुढील महिन्याच्या अंकात तसेच आपल्या व्हॉट्सअप ग्रुप व फेसबुक पेज वर प्रसारित करण्यात येईल.**

# बोडण : कोकणस्थांची एक पारंपारिक प्रथा

बोडण भरण्यासाठी मंगळवार वा शुक्रवार असावा. प्रसंगी रविवार देखील चालतो. मात्र त्या दिवशी एकादशी, चतुर्थी तसेच पौर्णिमा / आमावस्या असू नये. बोडण भरण्यासाठी चार सवाष्णी व एक कुमारिका अशा पाच जणी लागतात. सर्व सवाष्णी लेकुरवाळ्या असाव्यात. कुमारिकेचे यांत विशेष महत्व आहे. ज्यांच्याकडे सात सवाष्णी सांगण्याची प्रथा आहे त्यांनी बाहेरच्या पाच, घरची एक व कुमारिका अशा सातजणी पुजेसाठी सांगाव्यात.

**पुजेची तयारी :** चौरंग किंवा पाट, पितळ्याची मोठी परात, कणकेचे दिवे पाच, पाटा-वरवंटा, पाच सवाष्णींचे पाच महानैवेद्य. हा महानैवेद्य पुरणा-वरणाचा लागतो. नेहमीची पंचामृत पुजेची तयारी, दक्षिणा, विड्याची पाने, सुपारी, देवीची मूर्ती, गौरीची लेणी, लुगडी (मणी-मंगळसूत्र, वेणी हारा डेरा, चार कळस, जोडवी, विरोदी, भंडारा इत्यादी) हे सर्व कणकेचे करावे लागते.

**गौर बसविण्याची पध्दत :** पाटाच्या किंवा चौरंगाच्या चार बाजूला चार कळस लावावेत. नंतर पाट्या वरवंट्यावर गौर बसवावी, पाठीमागे दुधाने भरलेला हाराडेरा ठेवावा. सवाष्णींना व कुमारिकेला, आपल्या घरी न्हावयास घालावे. तसे जर जमले नाही तर तेल शिकेकाई प्रत्येकीला आमंत्रण देण्याच्या वेळी द्यावी. सर्वजणींनी न्हाऊन माखून रेशमी वस्त्र नेसून पूजेला बसावे. कुमारिका ३ ते १० वर्षापर्यंतचीच असावी. सवाष्णी व कुमारिका पूजेकरिता आपल्या घरी आल्या की प्रथम कोमट पाणी घेऊन त्यांच्या पायावर घालावे. नंतर पायावर दूध घालावे व पुन्हा गरम पाणी घालून पाय स्वच्छ धुवावेत. पाय स्वच्छ कापडाने पुसून दोन्ही पायांवर हळद व कुंकवाची बोटे उठवावीत किंवा स्वस्तिक काढावे. कपाळाला हळद कुंकू लावावे. औक्षण करून घरात न्यावे व पूजेला बसवावे. तुळशीची पूजा करून घरच्या सवाष्णीने तुळशीची ओटी भरावी व मग सर्व सवाष्णींची ओटी भरावी. बोडण भरतेवेळी प्रत्येकीने ओटी जवळ ठेवावी.

**पूजा :-** बोडण भरावयास बसताना घरच्या सवाष्णीचे तोंड पूर्व दिशेला असावे व तिने आपल्या उजव्या हाताला कुमारिकेस बसवावे. प्रथम पितळ्याच्या परातीमध्ये सुपारीच्या गणपतीची पूजा करावी. देवीला कोमट पाण्याने स्नान घालावे. तिला हळद कुंकू लावावे. देवीची यथासांग पूजा करावी व त्याच वेळी कणकेचे दिवे लावावेत. महानैवेद्य कालवायला सुरुवात करण्यापूर्वी हे दिवे दुधाने शांत करावेत. नंतर खेळावयास (बोडण कालवावयास) सुरुवात करावी. बोडण कालवत असताना व्यंकटेश स्तोत्र म्हणावे स्तोत्र संपेपर्यंत खेळवत राहावे. कालवलेल्या महानैवेद्यात देवी, पैसा, गणपतीच्या पूजेची सुपारी, विडा वगैरे घालून देवीला खेळवावे. बोडणाचे नैवेद्य करताना छोट्या छोट्या पाच पुरणपोळ्या करून त्या केळीच्या पानावर ठेवाव्यात व नंतर त्यावर इतर पदार्थ वाढावेत. महानैवेद्य एकत्र कालवावेत व वरून सवाष्णींनी किंवा घरच्या पुरुषाने दुधाची, दह्याची, तुपाची, मधाची व साखरेची एक एक धार सोडावी.

काही ठिकाणी घरच्या सवाष्णीने ही धार सोडावयाची पध्दत असते. अशा वेळी जर एखाद्या सवाष्णीच्या अंगात आले तर ती संतुष्ट होईपर्यंत तिला जो हवा असेल तो पदार्थ द्यावा. (उदा. दूध, दही, तूप, साखर, मध इ.) ती सवाष्ण जितके म्हणून दूध, तूप वगैरेची धार सोडावयास सांगेल तेव्हढे बोडण घालावे. या कुलाचारात कुमारिकेचे फार महत्व असते. तिला तू धायलीस काय? म्हणजे तृप्त झालीस काय ? असे विचारतात. ती तृप्त झाल्यावर बोडण कालवणे व पंचामृत घालणे बंद करावे.

कुमारिकेने बोडण कालवत असताना बोडणात पैसा, सुपारी तिची तिने जवळ ठेवून, अन्नपूर्णा देवी गृहस्वामिनीकडे द्यावी. खेळणे झाल्यावर सवाष्णींनी इतर कशानेही हात न धुता प्रथम पुरणाने हात धुवावेत. नंतर साध्या पाण्याने हात धुवून ते पाणी बोडणात घालावे. मगच बेसीन किंवा मोरीत जाऊन हात धुवावेत. नंतर गौरीला पुरण लावून स्वच्छ धुवावे व व्यवस्थित जागेवर बसवावे. तिला हळद कुंकू लावून नेहमीप्रमाणे पूजा करून महानैवेद्य दाखवावा. देवीला पंचामृताने स्नान घातल्यावर जे तीर्थ असते ते सर्वांनी घ्यावे. कालवलेले जे बोडण असते त्यातील थोडेसे बाजूला काढून तो अंगारा म्हणून सर्वांनी कपाळाला लावावा. घरातील सर्वांनी मनोभावे नमस्कार करावा.

नंतर सवाष्णींना व कुमारिकेला भोजनाला बसावयास सांगून त्यांचे मनसोक्त जेवण झाल्यावर सर्व सवाष्णींची व कुमारिकेची ओटी, खण व नारळाने भरावी. सर्व करणे शक्य नसल्यास निदान सवाष्णींची नुसती ओटी भरून कुमारिकेची नारळाने ओटी भरावी. नैवेद्य मांडताना पांच बोडणाचे, एक घरच्या देवाचा व एक कुमारिकेचा असे नैवेद्य वाढावेत. तसेच वास्तुपुरुष व गोग्रास असेही नैवेद्य दाखवावेत. यानंतर उरलेले जे सर्व बोडण असते ते दिवस मावळण्यापूर्वी गाईला खावयास द्यावे. गायीला बोडण खायला देण्यापूर्वी त्यातील पैसा व सुपारी काढून ठेवावी. गाय उपलब्ध नसल्यास ते सर्व नदीमध्ये / वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन करावे.


**बोडणाचे काही नियम :** बोडण हे चातुर्मासात, पौष महिन्यात, घरात गाय गाभण असल्यास, घराण्यात कोणी स्त्री गरोदर असल्यास भरता येत नाही. परंतु नवरात्रात पंचमीच्या दिवशी बोडण भरण्याचीही प्रथा काही घरांमध्ये आहे. माहेरवाशीण जर गरोदर असेल तर बोडण भरण्यास हरकत नाही. मात्र तिने ही पूजा पाहू नये असे शास्त्रात सांगितले आहे. बोडण हे दुपारी १२ पूर्वी भरावे. बोडण कालवताना माय–लेकी, सासू–सून, बहिणी–बहिणी आणि नणंद–भावजय असे बसू नये.

**बोडणाचा स्वयंपाक :** बोडणाच्या दिवशी मुख्य स्वयंपाक वरण–भात, भाजी, पुरणपोळी, तळण, खीर–पुरण व बाकीचा स्वयंपाक इतर सणांप्रमाणेच करावा.

**– ध्यान –**

देवीं भक्तं जनप्रियां सुवदनां खड्गंच पात्रं तथा ।
स्वर्णालंकृत लागलं सुमुसलं हस्तैर्दधानां श्रियं ।
विद्युत्कोटि रवींदुकांति धवला दंतासुरोन्मुलिनीम् ।
ब्रहोंद्राद्यभि वंदितांच वरदा योगेश्वरी संभजे ।।१।।

## बोडणाची रांगोळी



## बोडणाची आरती

**१) देवीची आरती**

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ।।
अनाथनाथे अम्बे......।

**२) बोडणाची आरती**

जयदेवी जयदेवी जय अंबाबाई ।
चित्तवृत्ती जडली तुझिये चरणी ।।धृ।।
कोल्हापूरहुनि अंबे तू येशी,
पंचामृती पूजन तुझे करिती ।
धूप, दीप, नैवेद्य तुला समर्पिती,
मग अंबे तुझी प्रार्थना करिती ।। जयदेवी ।।१।।
मध्यान्हकाळी अंबे प्रकट होऊनी,
कुमारी सहित पाच सुहासिनी पुजूनी ।
हळद–कुंकू, फुले, विडा–दक्षिणा देऊनी,
मग अंबे तुझी आरती करुनी ।। जयदेवी ।।२ !!
पुरण, वरण, तळण करुनि नैवेद्य समर्पिले,
परातीमध्ये घालुनि दिवे वर मांडियले ।
दूध, तूप घालूनी शांत ते केले,
मग अंबे तूझे बोडण भरिले ।। जयदेवी ।। ३ ।।
कोल्हापुराहूनी प्रकट तू होशी,
कृष्णा लागतसे तुझ्या चरणाशी ।
देहासहित नेई आपुल्या पायाशी,
हीच प्रार्थना करितसे तुजसी ।। जयदेवी ।।४।।

सौजन्य : श्री. विलास फडके
विशेष सहकार्य : श्री. सुधीर वैशंपायन, पेण



## स्नेहबंध मैत्रिणींचा – आगामी कार्यक्रम....
## चैत्र गौर हळदी कुंकू



शुक्रवार दि.२७ मार्च रोजी स्नेहबंध मैत्रिणींचा, मंडळाचा वासंतिक उत्सव (चैत्र गौर हळदीकुंकू) आपल्या संस्थेच्या...श्री परशुराम भवनमधील डॉ. लेले सभागृहमध्ये आयोजित केला आहे... तरी जास्तीत जास्त महिलांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे.

**ठिकाण :** 'श्री परशुराम भवन' **वेळ :** ५ ते ७ पर्यंत.

## चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
# देणगीदार - फेब्रुवारी २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| ०१ | श्रीमती वसुधा वासुदेव घारे | १५,०००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वधू यादी

| नाव पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमारी प्राजक्ता प्रशांत बरवे**<br>६, दिव्यप्रसाद अपार्टमेंट, आकाशवाणी टॉवर जवळ, आदर्श कॉलनी, गंगापूर रोड, नाशिक<br>मोबा.: ९८२२२७७१४२ | ०९/०२/१९९९ | कौशिक | ५'.६'' | बी.ई. मॅकेनिकल इंजि. | - |

## चित्तपावन ब्राह्मण संघ : वर यादी

| नाव पत्ता व फोन | जन्म तारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| **कुमार आनंद मनोहर गाडगीळ**<br>१८, यमुना बंगला, माणिक नगर, गंगापूर रोड, नाशिक. मो.: ८६५७०२६३५८ | ०९/०५/१९९२ | गार्ग्य | ५'.८'' | बी.ई. मॅकेनिकल इंजि. | १.५० लाख |
| **कुमार अथर्व सुहास उपासनी**<br>संकल्प सिद्धी रो.हा.नं.१, ओमकार मोटर्स समोर, हरी ओम नगर, मखमलाबाद, पंचवटी, नाशिक<br>मोबा.: ७८७५५२७०८२ | ११/०६/१९९९ | जाष्क्य | ५'.९'' | बी.ई. मॅकेनिकल इंजि. | ७०,०००/- |



## भावपूर्ण श्रद्धांजली...

आपल्या संस्थेचे सभासद नीलकंठ लक्ष्मण भावे यांचे वयाच्या १०० व्या वर्षी दि. ३ जानेवारी २०२६ रोजी पुणे येथे अल्प आजाराने दुःखद निधन झाले. १९६० पासून ते नाशिक येथे सुरुवातीला गोरेराम गल्ली, रविवार कारंजा येथे नंतर समर्थनगर, कॉलेज रोड येथे २०१५ पर्यंत वास्तव्यास होते. ते राज्यशासनाच्या पाटबंधारे विभागात कार्यरत होते व १९८४ मध्ये सेवानिवृत्त झाले. त्यांच्या पत्नी शैला नीलकंठ भावे या पुष्पावती रुंग्ठा विद्यालयात शिक्षिका होत्या. २०१८ मध्ये त्यांचे निधन झाले. मुलगा श्री. राममोहन भावे हे C.A., I.C.W.A., C.S., I.F.R.S. असून फायनान्स, valuation artificial intelligence क्षेत्रात मुंबई येथे कार्यरत आहेत आणि सून डॉ. सौ. अंजली भावे या मुंबई मध्ये कॉमर्स कॉलेज येथे प्राध्यापिका होत्या. मुलगी संगीता भावे म्हणजे सध्याच्या डॉ. अश्विनी अजित केळकर व जावई हे दोघेही डॉक्टर असून पुणे येथे वैद्यकिय क्षेत्रात कार्यरत आहेत. संस्थेच्या वतीने नीलकंठ भावे यांना भावपूर्ण श्रद्धांजली !



आपल्या संस्थेचे सभासद व फोटोग्राफर पराग हरिभाऊ वैशंपायन यांचे दि.१२ फेब्रुवारी रोजी दुःखद निधन झाले. ते पुरुषोत्तम फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष होते. या फाऊंडेशन मार्फत गरीब गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना आर्थिक, शैक्षणिक, वैद्यकिय मदत करीत होते.

त्यांच्या मागे पत्नी माधुरी या आहेत. वैशंपायन कुटुंबियांच्या दुःखात संस्था, कार्यकारिणी सभासद सहभागी आहेत. संस्थेच्या वतीने पराग वैशंपायन यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

(पान नं.२ वरून)

तुमि विद्या तुमि धर्म, तुमि हृदि तुमि मर्म,
त्वं हि प्राणाः शरीरे। बाहु मे तुमि मा शक्ति,
हृदये तुमि मा भक्ति तोमारइ प्रतिमा गडि मन्दिरे।
त्वं हि दुर्गा दशप्रहरण-धारिणी कमला कमल-दल-विहारिणी
वाणी विद्यादायिनी नमामि त्वाम् नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम् । श्यामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणीं भरणीं मातरम् ।।

मुळात बंगाली भाषेत असलेल्या वंदे मातरम् या गीताचा योगी अरविंद यांनी इंग्रजीमध्ये गद्य अनुवाद केला आहे. त्याचा हा त्यांच्याच भवानी भारतमाता मधील मराठी अनुवाद,।

हे माते मी तुला वंदन करीत आहे.
जलसमृद्ध आणि धनधान्य असणाऱ्या हे माते,
दक्षिणवाऱ्यामुळे तू शीतलतून झाली आहेस,
सुगीच्या पिकांनी घनगर्द झालेल्या हे माते,
मी तुला वंदन करीत आहे.
चंद्रप्रकाशाच्या वैभवामध्ये तुझ्या रात्री न्हाऊन निघाल्या आहेत
विविध फुलांनी बहरलेले वृक्षरूपी सुंदर वस्त्र
तुझ्या भूमीने परिधान केले आहे
तुझे हास्य मंजुळ आहे आणि तुझी वाणी मधुर आहे
परमानंदप्रदायिनी, वरदायिनी असणाऱ्या हे माते
मी तुला वंदन करीत आहे.
सप्तकोटी मुखांमधून उठणाऱ्या गर्जनांनी
आणि सप्त कोटी प्रजाजनांच्या
दोन्ही हातांमध्ये उगारलेल्या शस्त्रामुळे
तू रुद्रभीषण दिसत आहेस, तेव्हा हे माते
तू दुर्बल आहेस असे म्हणण्याचे धारिष्ट्य कोण बरे करेल?
अपरिमित शक्ती धारण करणाऱ्या रक्षणकर्त्या मातेसमोर
आणि शत्रूच्या पलटणी पळवून लावणाऱ्या मातेसमोर
मी नतमस्तक आहे. हे माते मी तुला वंदन करीत आहे.
तूच ध्यान आहेस आणि तूच आमचा स्वधर्म आहेस
तूच आमच्या हृदयामध्ये निवास करते आहेस,
तूच आमचा आत्मा आहेस आणि
आमच्या देहामधील प्राणही तूच आहेस,
आमच्या बाहुंमधील शक्ती सामर्थ्य तूच आहेस,
आमच्या हृदयामधील प्रेम आणि श्रध्दादेखील तूच आहेस.
आम्ही सर्व मंदिरांमध्ये तुझ्याच मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करीत असतो.
कारण तू युद्ध शस्त्रे धारण केलेली दशभुजा दुर्गा आहेस,
आणि कमलपुष्पांमध्ये विरहणारी सौंदर्यदेवतादेखील तूच आहेस
परावाणीरूप असणाऱ्या, वेदप्रदायिनी देवते,
मी तुला वंदन करीत आहे.
हे ऐश्वर्यदेवते
विशुद्ध व अनुपम जलप्रवाहांनी आणि
फळाफुलांनी समृद्ध असणाऱ्या हे माते,
मी तुला वंदन करीत आहे.
श्यामलवर्णी, ऋजुस्वभावी, सुहास्यवदन असणाऱ्या,
आभूषण परिधान केलेल्या, शृंगाराने विनटलेल्या,
वैभवधारिणी हे माते,
वैविध्यसंपन्न हे माते, मी तुला वंदन करीत आहे.

'वंन्दे मातरम्' मध्ये ही सगळी वर्णने थोडक्यात परंतु रूपकात्मक पद्धतीने येतात. ऋषी बंकिमचंद्रांनी या काव्यात विविध रसांचा उपयोग सहजपणे केलेला दिसतो. पहिल्या कडव्यात आणि शेवटच्या दोन ओळीत शांतरस आहे. 'कोटि कोटि कंठ' या कडव्यात वीर रस आहे. 'अबला के नमा' मध्ये रौद्र रस आहे. 'तुम्ही विद्या तुम्ही धर्म' या कडव्यात कमालीचा भक्तीरस आहे आणि पुन्हा शेवटच्या कडव्यात वीर, शांत आणि भक्ती हे तीनही रस आहेत. या सर्वांपेक्षा माता आणि राष्ट्र यांचा संबंध थेट मातृभूमी असा लावून ऋषी बंकिमचंद्रांनी या काव्याचं नाते थेट वेदकाळाशी जोडले. 'मातृभूमी पूजन' या अथर्ववेदातील संकल्पनेला बंकिमचंद्रांनी वंन्दे मातरम् च्या माध्यमातून पुनरुज्जीवित केले.

बंकिमचंद्रांच्या अंतिम काळात जरी लोकांना त्यांचे महत्व कळले नसले तरी त्यांच्या निधनानंतर अकरा वर्षांनी हे शब्द संपूर्ण भारतात उच्चस्वरात निनादले जाऊ लागले. ऋषी बंकिमचंद्रांनाही कदाचित आपल्या शब्दांचा परिणाम एवढा दीर्घकालीन होईल, अशी अपेक्षा नसेलही, परंतु या शब्दांचे सामर्थ्य ते जाणून होते. त्यांनी भाकीत करून ठेवले होते की, हे शब्द काही काळानंतर भारतीय डोक्यावर घेऊन नाचतील. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात वंन्दे मातरम् या शब्दांनी निर्माण केलेला उत्साह, देशभक्तीची भावना मोठा स्वातंत्र्य लढा संपल्यानंतरच्या काळातही कायम राहिला आणि आज दीडशे वर्षे होऊन सुद्धा तोच भाव भारतीयांच्या मनात कायमस्वरूपी आहे.

वंन्दे मातरम्

सर्वेश फडणवीस - ८६६८५४११८१
सौजन्य : प्रज्ञालोक अभ्यास मंडळ त्रैमासिक
संजय परांजपे - ९८२२०३३०४९


## नाशिक चा इतिहास आणि वारसा स्थळे - एक अनोखा कार्यक्रम : क्षणचित्रे







नाशिक चा इतिहास आणि वारसा स्थळे
कार्यक्रमात माहिती देताना श्री.रमेश पडवळ



## * संस्थेच्या कार्यालय वेळेत बदल *

चित्तपावन ब्राह्मण संघ नाशिक या आपल्या संस्थेच्या ऑफिस ची वेळ दि. १ नोव्हेंबर २०२५ पासून सकाळी १० ते दुपारी २ व दुपारी ४ ते रात्री ८ अशी करण्यात आलेली आहे याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, एस.बी.आय.बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.